राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे

राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा

२०२१-२२

माध्यमिक  शिक्षक गट

'' कलाकृतींच्या निर्मितीतून संस्कृतीचा शिकवू वारसा

आत्मनिर्भर विद्यार्थी घडवू, जागृत करूनी आत्मविश्वासा''

सादरकर्ती

डॉ.  सौ उषा अनिरुद्ध कुलकर्णी

एम. ए.एम.एड.,पीएचडी, डी.एस्.एम्.

सहाय्यक शिक्षिका ,

ज्युबिली इंग्रजी कन्या शाळा मिरज

मार्गदर्शक

डॉ. राजेंद्र भोई

वरिष्ठ अधिव्याख्याता

जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था, सांगली

अनुक्रमणिका


| अ.क्र. | शीर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | ३ ते ४ |
| २ | नवोपक्रमाचे शीर्षक | ५ |
| ३ | नवोपक्रमाची गरज व महत्व | ६ ते ७ |
| ४ | क्षमतांनुसार उद्दिष्टे | ८ |
| ५ | नवोपक्रमाची उद्दिष्टे | ९ |
| ६ | नवोपक्रमाची व्याप्ती | १० |
| ७ | नवोपक्रमाचे नियोजन | ११ ते १५ |
| ८ | नवोपक्रमाची कार्यपध्दती | १६ ते २४ |
| ९ | नवोपक्रमाची यशस्विता / फलनिष्पती | २५ ते २७ |
| १० | सारांश | २८ |
| ११ | समारोप | २९ |
| १२ | संदर्भसूची | ३० |
| १३ | परिशिष्ट | ३१ ते ३८ |

१. प्रस्तावनाः-

गेल्या दीड ते दोन वर्षापासून संपूर्ण जग कोरोना महामारीने ग्रासले आहे. संसर्गाच्या भीतीने मुलांना या रोगापासून वाचविण्यासाठी शाळा बंद आहेत. तथापि शिक्षकांनी ऑनलाईन शिक्षणाच्या वाटा अवलंबिल्या आणि मुलांचे शिक्षण चालू ठेवले.

शाळा बंद असल्याने मुलांची शिक्षणाची प्रक्रिया चालू ठेवण्यात शिक्षकांची भूमिका महत्त्वपूर्ण आहेच, परंतु सतत घरात राहिल्याने एकांतवासामुळे मुलांची मानसिकता बदललेली आढळते त्यांच्या कारक कौशल्याचा विकास खुंटला कल्पनाशक्तीला मर्यादा पडल्या निर्मिती क्षमतेला वाव मिळेनासा झाला.

शिक्षकांनी ऑनलाईन शिक्षणाच्या विविध साधनांचा वापर करून मुलांचे शिक्षण चालू ठेवले हे जरी खरे असले तरी विद्यार्थ्यांच्यात कमी झालेला आत्मविश्वास वाढवणे अतिशय गरजेचे आहे त्यांच्या कृती कौशल्यांचा विकास करणेही महत्त्वाचे आहे. तसेच विद्यार्थिनींना सहजपणे करता येणा-या कलाकृती, साहित्य निर्मितीतून अर्थार्जनही करता येईल त्यांच्या कल्पनाशक्तीला वाव मिळून त्यांच्याकडून समाजपयोगी पर्यावरण पूरक अशा बाबी तयार करून घेऊन त्यांचा वेळ सत्कारणी लावणे आवश्यक वाटले

कोरोना महामारीच्या काळात पालक व शिक्षकांच्या समोर विद्यार्थ्यांना सकारात्मक ऊर्जा देत गुंतवून ठेवणे हे एक मोठे आव्हानच होते. विद्यार्थ्यांचे ऑनलाइन अभ्यासाचे तास सुरू झाले. सततच्या अभ्यासातून विद्यार्थ्यांना थोडे मनोरंजनही हवे. काही विद्यार्थ्यांचे दोन्ही पालक नोकरी-व्यवसायानिमित्त घराबाहेर जातात अशा विद्यार्थ्यांना विविध सोप्या कलाकृती शिकविल्यास विद्यार्थ्यांची उपजतच असणारी सळसळणारी ऊर्जा विधायक कामात वापरली जाईल. त्याचे मनोबल वाढेल आणि समाजोपयोगी निर्मितीशी ते जोडले जाऊन त्यांना भविष्यकाळात अर्थार्जनही करता येईल हा आत्मविश्वास निर्माण होईल. काही घरातील दोन्ही पालक घरी नसतात. विभक्त कुटुंब पद्धतीमुळे संस्कृती परंपरांचे संस्कार जे पूर्वी सहजपणे घरात व्हायचे ते होणे कठीण झाले पालकांकडे वेळेचा अभाव असल्यामुळे बहुतांशी गोष्टी विकत आणण्याकडे कल असतो सण-उत्सवाला लागणारे बहुतेक जिन्नस बाजारातूनच बहुधा खरेदी केले जातात जर आपल्या विद्यार्थिनींना हे करायला शिकवले तर यातून बऱ्याच गोष्टी साध्य होतील. विद्यार्थ्यांच्या या वेळेचा सदुपयोग होईल. स्वनिर्मितीचा

आनंद मिळेल संस्कृतीचा संस्कार, श्रमाविषयी आदर वाटेल. अर्थार्जनाचा मार्ग गवसेल कौशल्य विकासातून आत्मविश्वास वाढेल.

एकातून एक असे विचार सुचत गेले आणि या नवोपक्रमाची संकल्पना साकार झाली माझी मुलींची शाळा असल्याने त्यांच्यातील उपजत आवडींवर आधारित परंतु आपल्या सण उत्सव, विशेष दिनांशी निगडित प्रसंगोपात नवोपक्रम घ्यावा असे मला वाटले. त्यामुळे त्यांना नवनिर्मितीसह परंपरांचेही ज्ञान मिळावे हाही एक हेतू होता. जेव्हा मी विद्यार्थिनींशी ऑनलाईन तासांच्या वेळी संवाद साधायचे त्या वेळी मला असे जाणवले की **विद्यार्थिनींच्या कलात्मक अध्ययनात क्षय (Learning Loss) झाला आहे.** विद्यार्थी व्यक्तिमत्व विकासात अभ्यासाबरोबर याही गोष्टींना अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यामुळे या नवोपक्रमाच्या माध्यमातून हा अध्ययन क्षय (Learning Loss) कमी करण्याचे ठरविले आणि हा नवोपक्रम घेण्याचे निश्चित केले.

२. नवोपक्रमाचे शीर्षक

''कलाकृतींच्या निर्मितीतून संस्कृतीचा शिकवू वारसा
आत्मनिर्भर विद्यार्थी घडवू, जागृत करूनी आत्मविश्वासा''

३. नवोपक्रमाची गरज व महत्त्व

**गरज-**

कोरोनाच्या वैश्विक महामारी मुळे शाळेत प्रत्यक्ष जाऊन शिक्षण घेणे शक्य नसल्याने विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन शिक्षण सुरू झाले. शारीरिक, मानसिक, आर्थिक ताण तणावांतून कुटुंब जात असताना विद्यार्थ्यांचेही मनोबल वाढविण्यासाठी त्यांना अभ्यासाबरोबरच अभ्यासेतर उपक्रमात गुंतवून ठेवणे आणि त्यांचा वेळ सत्कारणी लावणे आवश्यक वाटले. सध्या मुलांना मोकळ्या वातावरणात आपल्या सवंगड्यांशी खेळता येत नाही आणि घरात राहून सतत अभ्यास करीत राहणे हेही शक्य होत नाही. ऑनलाईन तासाच्या वेळी संवाद साधताना असे आढळले की **विद्यार्थिनींचा कृतीयुक्त कौशल्ये शिकण्यासंबंधी अध्ययन क्षय (Lerning Loss)झाला आहे.**

पूर्वी घरांघरांतून सहजपणे होणारे अनौपचारिक शिक्षण कुटुंबाच्या बदलत्या स्वरूपामुळे दुरापास्त झाले आहे. मुलांचा घरातल्या कामांशी संबंध तुटल्यामुळे जीवनावश्यक कौशल्ये दुर्लक्षिली केली गेली आहेत. या कौशल्यांचा उपयोग

- विद्यार्थ्यांवर सांस्कृतिक संस्कार करण्यासाठी
- श्रम आणि श्रमिक यांचे महत्त्व त्यांच्या मनावर बिंबवण्यासाठी
- भविष्यात आणि सध्याच्या काळात अर्थार्जन करून कुटुंबाला हातभार लावण्यासाठी करता येऊ शकेल.
- विद्यार्थिनींचा आत्मविश्वास वाढेल आणि त्या आत्मनिर्भर बनतील

यासाठी हा उपक्रम राबविण्याची गरज निर्माण झाली.

**वेगळेपण-**

या उपक्रमाचे वेगळेपण असे आहे की, साधारणपणे बरेचसे नवोपक्रम सादरकर्ते विद्यार्थ्यांच्या अभ्यास विषयक बाबींशी निगडित उपक्रम राबवतात. परंतु माझा नवोपक्रम

- विद्यार्थ्यांमधील कृतियुक्त शिक्षणातील अध्ययन क्षय (Learning Loss)कमी करेल.
- सध्याच्या कोरोनाच्या लॉकडाऊन काळात कल्पकतेला वाव मिळेल.
- तणावमुक्त राहण्यासाठीही साहाय्यभूत ठरेल.

विद्यार्थ्यांमध्ये नवीन काहीतरी शिकण्याची करण्याची ऊर्जा असते. या उपक्रमातून तिला प्रोत्साहन देता येईल.

या उपक्रमाची खासियत अशी आहे की, घरात सर्वसाधारणपणे उपलब्ध असणाऱ्या सामुग्रीमधून आपल्या सण उत्सवांसाठी, विशेष दिवसांसाठी उपयुक्त कलाकृती, साहित्य, खाद्यपदार्थ तयार करून त्यातून अर्थार्जन करण्याइतका आत्मविश्वास विद्यार्थ्यांच्यात निर्माण करून त्यांना आत्मनिर्भर बनवता येईल.

**उपयुक्तता / महत्व**

- माझे सहकारी शिक्षक तसेच इतर शिक्षकांनाही त्यांच्या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम राबविता येईल आणि त्यांची कल्पकता विकसित करता येईल.
- कृतीयुक्त कौशल्य विकासातील अध्ययन क्षय(Learning Loss) कमी करता येईल.
- दैनंदिन जीवनात पर्यावरण रक्षण कसे साधता येईल याची जाणीवही विद्यार्थ्यांना होईल.
- नवनिर्मिती क्षमता विकसित झालेला, भारतीय संस्कृतीतील परंपरांचे संवर्धन व संक्रमण करू शकणारा, संस्कारी, आत्मनिर्भर विद्यार्थी भविष्यकाळातील राष्ट्राचा जागरूक, संस्कृती अभिमानी, कल्पक नागरिक नक्कीच बनेल.
- पालकांनाही आपल्या पाल्याला जीवनाभिमुख कौशल्य प्राप्त करताना होणारा आनंद पाहताना नक्कीच समाधान वाटेल.

विद्यार्थी, शिक्षक, पालक, शाळा, समाज अशा सर्वांनाच निश्चितपणे उपयुक्त आणि आदर्शवत असाच हा नवोपक्रम आहे.

टेबल क्रमांक ०१

४. क्षमतांनुसार उदिष्टे

| अ.क्र. | क्षमता | क्षमता विधान | उद्दिष्टे |
|---|---|---|---|
| १. | सृजनशीलता | नवनिर्मितीमध्ये स्वतःच्या सृजनशीलतेच्या आधारे कलाकृती तयार करता येण्यासाठी क्षमता प्रतिपादित करणे. | विद्यार्थ्याच्या सृजनशीलतेच्या आधारे नवनिर्मिती करण्यास प्रोत्साहित करणे. |
| २. | प्रसंगोपात उत्पादक उपक्रम | प्रसंगोपात उत्पादक उपक्रमांची ओळख करुन घेण्याची क्षमता प्रतिपादित करणे. | विद्यार्थ्यांना प्रसंगोपात उत्पादक उपक्रमांची ओळख करुन घेण्यास प्रोत्साहित करणे. |
| ३ | श्रमप्रतिष्ठा | श्रमाच्या कामात स्वतः सहभागी होण्याची तसेच श्रमजीवी लोकांबद्दल आदर निर्माण करण्याची क्षमता प्रतिपादित करणे. | विद्यार्थ्यांना उत्पादक कार्य करण्याची उत्स्फूर्तपणे श्रम करण्याची आणि श्रमजीवी व्यक्तींबद्दल आदर निर्माण करण्याची क्षमता विकसित करणे |
| ४ | सामाजिक सांस्कृतिक भान संस्कृतीचे जतन व संवर्धन | सामाजिक रुढी, परंपरा, प्रथा यांची ओळख करुन त्यांचे जतन व संवर्धन करण्याची क्षमता प्रतिपादित करणे | विद्यार्थ्यांमध्ये समाजाचा जबाबदार घटक होण्याची जाणीव निर्माण करुन संस्कृतीचे जतन व संवर्धन करण्यासाठी उपक्रमशीलता विकसित करणे. |
| ५ | आत्मनिर्भरता | उत्पादक कार्यातून अर्थार्जन करण्याची जाणीव निर्माण होण्याची क्षमता प्रतिपादित करणे | विद्यार्थ्यांच्यातील आत्मविश्वास जागृत करुन उत्पादनातून अर्थार्जन करुन आत्मनिर्भर होण्यासाठी प्रोत्साहित करणे. |

५. नवोपक्रमाची उद्दिष्टेः-

विद्यार्थ्यांचा बौद्धिक, भावनिक आणि कौशल्यात्मक विकास होण्यासाठी शालेय जीवनात त्यांना प्रत्यक्ष कृतीयुक्त अध्ययनाचा अनुभव देणे आवश्यक आहे शालेय शिक्षण विद्यार्थ्यांच्या दैनंदिन जीवनाशी जोडले गेले पाहिजे. यातून व्यवसायिक शिक्षणाचा पाया रचला जावा. तसेच भावी जीवनात उपयोगी अशी कौशल्ये विकसित करीत असताना अध्ययन क्षय(Learning Loss) दूर करण्यासाठी कौशल्यावर आधारित उपक्रम घेण्याच्या दृष्टीने खालील उद्दिष्टे निश्चित केली.

१. विद्यार्थिनींच्यामधील कृतियुक्त नवनिर्मिती क्षमतांशी निगडीत अध्ययन क्षय शोधणे.
२. विद्यार्थिनींमध्ये नवनिर्मिती क्षमता येण्यासाठी उपक्रमांची निर्मिती करणे.
३. विद्यार्थिनींमध्ये श्रमप्रतिष्ठा मूल्य जोपासणे.
४. विद्यार्थिनींमध्ये प्रात्यक्षिकाद्वारे नवनिर्मिती क्षमता विकसित करणे.
५. विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास वाढवणे आणि त्यांना आत्मनिर्भर बनविणे.
६. विद्यार्थिनींमध्ये नवनिर्मिती क्षमता येण्यासाठी राबविलेल्या उपक्रमांची परिणामकारकता अभ्यासणे.

६. नवोपक्रमाची व्याप्तीः-

सदर उपक्रमात ज्युबिली इंग्रजी कन्या शाळा, मिरज येथील इयत्ता ६ वी ते ८ वी मध्ये शिकणाऱ्या एकूण २० विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या.

७. **नवोपक्रमाचे नियोजन**

१. **उपक्रम पूर्वस्थितीचे निरीक्षण**

कोरोना महामारीच्या या काळात, आमची शाळा शहरी भागात असल्याने मोबाईलवरुन ऑनलाइन शिक्षणच सुरू आहे. त्यावेळी असे लक्षात आले की कलात्मक नवनिर्मिती कौशल्यांचा विद्यार्थिनींमध्ये अध्ययन क्षय (Learning Loss) झाला आहे

आपल्या भारत देशाला खूप मोठा सांस्कृतिक वारसा लाभला आहे. प्रत्येक प्रांता प्रांतांमध्ये विविध सण उत्सव साजरे होतात. विशेष दिन साजरे केले जातात. त्यासाठी लागणारे साहित्य, कलाकृती निर्माण करण्यासाठी विद्यार्थिनींना प्रेरित करणे आवश्यक वाटले. यातूनच संस्काराचा वारसा पुढील पिढ्यांकडे संक्रमित केला जातो. सण उत्सवांसाठी आज बऱ्याचशा तयार कलाकृती, साहित्य बाजारातून आणण्याकडे बहुतेकांचा कल असतो. या वस्तू विद्यार्थिनीनी स्वतः तयार केल्यास

- त्यांना स्वनिर्मितीचा आनंद मिळेल.
- स्वतःच्या कुटुंबात याचा वापर करतील.
- त्यांची विक्री करून आत्मनिर्भरही होतील होती असे प्रकर्षाने वाटल्याने सदर नवोपक्रमाद्वारे विविध कलाकृती व साहित्य विद्यार्थिनींना मोबाईलच्या सहाय्याने ऑनलाइन शिकवण्याचे नियोजन केले.

२. **संबंधित व्यक्तींशी तज्ज्ञांशी चर्चा**

सदरचा नवोपक्रम विद्यार्थिनींसाठी तयार करावयाचा होता.

१. त्यामुळे विद्यार्थिनींना ऑनलाईन तासांच्या वेळी नवोपक्रमाची कल्पना दिली.
२. त्याचे स्वरूप व व्याप्ती याची चर्चा केली.
३. विद्यार्थिनींचा या उपक्रमासाठी वेगळा Whatsapp ग्रुप तयार केला. त्याद्वारे त्यांच्याशी संवाद साधला.
४. नवोपक्रम सुरू करण्याविषयी शाळेच्या मुख्याध्यापिका, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षिका, सहकारी शिक्षक यांना कल्पना देऊन उपक्रमासाठी आवश्यक साधने आणि तंत्रे उपलब्ध करून घेतली.

५. निवृत्त उपक्रमशील शिक्षक श्री.वि.दि.आपटे सर, त्यांच्या पत्नी सौ. ज्योत्स्ना आपटे, समाजातील काही उपक्रमशील व्यक्ती यांच्याशीही नवोपक्रमासंबंधी चर्चा केली.

६. विद्यार्थिनींना उपक्रमाची संकल्पना समजावून देण्याचे नियोजन केले.

३. आवश्यक साधनांचा विचार

- सदर उपक्रमासाठी सण उत्सव, विशेष दिन यासाठी निगडीत कलाकृतींची व साहित्यांची यादी तसेच निर्मितीसाठी लागणा-या साहित्याची यादी तयार केली.

टेबल क्रमांक ०२ सणांनुसार आवश्यक साहित्याची यादी

| अ.क्र | विशेष दिन , सण उत्सव | कलाकृती/साहित्याचे नांव | लागणारे साहित्य |
|---|---|---|---|
| १ | आषाढी एकादशी | शेगांदाणा लाडू | भाजलेले शेंगदाणे, गुळ |
| २ | पूजा विधी साहित्य उदा.नागपंचमी,नवरात्र उत्सव,लक्ष्मीपूजन | गेजमाळ,फुलवात,समईतील वात गेजमाळांची फुलमाळ | निवडलेला कापूस, कुंकू, पाणी, मोठ्या आकाराच्या टिकल्या |
| ३. | नागपंचमी | मातीचा नागोबा | साधी/शाडूची माती, पाणी, मणी |
| ४. | रक्षाबंधन | राखी | रेशीम धागे,मणी, टिकल्या,इत्यादी |
| ५. | पर्यावरणपूरक उपक्रम | कागदी पिशव्या | वर्तमानपत्र, पुठ्ठा,डिंक, दोरी/ नाडी |
| ६. | दिवाळी | रंगीत पणत्या , पणती स्टँड | मातीच्या पणत्या, रंगवायचे साहित्य, मणी टिकल्या फेविकॉल,नारळाची करवंटी, चकमक वापरात नसेलेली सी.डी.रंगीत कागद |
| ७ | मकरसंक्रांत | तीळगुळ शेंगदाणा लाडू | भाजलेले तीळ, भाजलेले शेंगदाणे, गूळ |

- **आवश्यक मूल्यमापन साधने**

१. उपक्रमपूर्व परिस्थितीची निरीक्षण सूची

२. उपक्रमोत्तर परिस्थितीची निरीक्षण सूची

**४. करावयाच्या कृतींचा क्रम-**

१. विद्यार्थिनींशी तासाच्यावेळी संवाद साधताना सण,उत्सवासाठी स्वतः काय तयार करतात याची माहिती घेतली. त्यावेळी असे लक्षात आले की ब-याच विद्यार्थिनींना स्वतः कापसाचे गेजवस्त्र, वाती, मातीचा नागोबा, इत्यादी तयार करता यत नाही.यातून त्यांच्या नवनिर्मिती करण्यातील अध्ययन क्षय(Learning Loss) शोधण्यास मदत झाली.

२. सण-उत्सव, त्यासाठीच्या कलाकृती/साहित्य, ते निर्माण करण्यासाठी लागणारे साहित्य यांची यादी तयार करणे.

३. साहित्य/कलाकृती निर्मितीच्या दृष्टीने त्यांचे वर्गीकरण करणे.

४. विद्यार्थिनींचे उद्‌बोधन करणे

५. कलाकृतींच्या निर्मितीसाठी प्रेरणा देणे.

६. घटकांशी संबधित माहिती संकलित करण्यासाठी उत्तेजन देणे

७. लागणा-या साहित्याची यादी विदयार्थिनींना देणे

८. कलाकृती/साहित्य तयार करण्याचे प्रात्यक्षिक दाखविणे.

वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाहीचे टप्पे आणि वेळापत्रक तयार केले.

**५. उपक्रमोत्तर स्थितीचे निरीक्षण**

सदर उपक्रमामुळे विद्यार्थिनींच्यात चैतन्य निर्माण झाले. स्वनिर्मितीचा आनंद अनुभवल्यामुळे विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वासही वाढला.

**६. कायर्वाहीचे टप्पे- वेळापत्रक**

सदर नवोपक्रम ऑनलाईन पध्दतीने जून महिन्यापासून घेतल्यामुळे त्यानुसार वेळापत्रक तयार केले. तसेच सदरचा उपक्रम सण- उत्सवाशी निगडीत असल्याने काही सण- उत्सवांची निवड करुन त्यानुसार उपक्रमाचे नियोजन केले.

टेबल क्रमांक ०३ कार्यवाहीचे वेळापत्रक

| अ.क्र. | महिना | उपक्रम |
|---|---|---|
| १. | जून २०२१ | *तज्ज्ञांशी चर्चा व मार्गदर्शन<br>*अध्ययन क्षय (Learning Loss) शोधून उपक्रमाचे नियोजन |
| २. | जुलै २०२१ | १.शेंगदाणा, गुळ लाडू तयार करणे<br>२.समईतील कापसाच्या वाती,फुलवाती, गेजवस्त्र (गेजमाळ) गेजमाळांच्या आकर्षक फुलमाळ तयार करणे. |
| ३. | ऑगस्ट २०२१ | १ मातीचे नागोबा तयार करणे<br>२ राखी तयार करणे |
| ४. | सप्टेंबर २०२१ | वर्तमानपत्राच्या साध्या व बंदाच्या कागदी पिशव्या तयार करणे |
| ५. | ऑक्टोबर २०२१ | १ जुन्या वापरलेल्या पणत्या रंगवून आकर्षकपणे सजवणे<br>२ जुन्या टाकाऊ सी डी पासून , पुठ्ठ्यापासून आणि नारळाच्या करवंटीपासून आकर्षक पणती स्टँड तयार करणे .<br>३ तीळगूळ शेंगदाणा लाडू तयार करणे |

**७. उपक्रमासाठी इतरांची मदत**

सदर उपक्रमासाठी

- शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती विनया पाठक, उपमुख्याध्यापक श्री.दयानंद लांडगे, पर्यवेक्षिका श्रीमती मंजिरी सोपल यांनी मोलाचे सहकार्य केले.
- उपक्रमातील कापसाच्या कलाकृती शिकविण्यासाठी सौ.ज्योत्स्ना आपटे यांनी सहकार्य केले.
- माझ्या सहकारी शिक्षिका सौ.शिवानी देशपांडे, ज्येष्ठ लिपिक श्री.किशोर बोरवणकर , विद्यार्थिनी यांची सक्रीय मदत झाली.
- विद्यार्थिनींच्या पालकांनीही सहकार्य केले.

- उपक्रमांची निर्मिती, उपक्रमांचे मूल्यमापन, सांख्यिकी विश्लेषण यासाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था सांगली येथील वरिष्ठ अधिव्याख्याता डॉ. राजेंद्र भोई यांचे मार्गदर्शन लाभले.
- उपक्रमाची अंमलबजावणी करताना जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था सांगलीचे प्राचार्य मा. डॉ. रमेश होसकोटी यांची प्रेरणा लाभली.
- आमच्या दि मिरज एज्युकेशन सोसायटीच्या संचालकांचेही सहकार्य लाभले.

**८. उपक्रमात सादर करावयाचे पुरावे**

१.नवोपक्रमत समाविष्टित उपक्रमांचे शिक्षिकेच्या कलाकृतींचे फोटो

२.विद्यार्थिनींनी केलेल्या साहित्यांचे फोटो

३.विद्यार्थिनींचे मनोगते

४.पालकांचे अभिप्राय

५.विद्यार्थिनीचा व्हिडिओ

## ८. नवोपक्रमाची कार्यपध्दती

'' कलाकृतींच्या निर्मितीतून संस्कृतीचा शिकवू वारसा
आत्मनिर्भर विद्यार्थी घडवू, जागृत करुनी आत्मविश्वासा''

**१. पूर्वस्थितीची निरीक्षणे व त्याच्या नोंदी**

सण-उत्सव, प्रसंगांनुसार विद्यार्थ्यांकडून कलाकृती तयार करून घेतल्यास त्यांना स्वनिर्मितीचा आनंद मिळतो. शाळेतील विद्यार्थिनींना आपली संस्कृती परंपरा यानुसार सण-उत्सव साजरे करताना स्वनिर्मित साहित्य, कलाकृती वापरण्याची प्रेरणा मिळावी, नवनिर्मितीची क्षमता विकसित व्हावी, समाज तसेच कुटुंबोपयोगी पर्यावरणपूरक वस्तूंच्या निर्मितीतून अर्थार्जन करून आत्मनिर्भर होता यावे अशा विचारांनी प्रेरित होऊन उपक्रमाला सुरुवात झाली.

हा उपक्रम ऐकून विद्यार्थिनी खूप आनंदित झाल्या. आपल्या परिसरात साजऱ्या होणाऱ्या सण-उत्सवांशी आणि दैनंदिन वापरासाठी उपयुक्त बाबींशी निगडीत उपक्रमांचे नियोजन केले.

**२. कार्यवाही दरम्यान निरीक्षणे व माहिती संकलन**

****इंटरनेटचा वापरः** तंत्रज्ञानाच्या आजच्या युगात इंटरनेटचा अतिशय प्रभावी वापर करून हवी ती माहिती उपलब्ध करून घेता येते. याचाच उपयोग करून विद्यार्थिनींना उपक्रमासाठी निवडलेल्या कृतींशी संबंधित माहिती संकलित करण्यास सांगितले.

****पूर्व योजनाः** आपल्या परिसरात साजरा होणाऱ्या निवडक सणांची यादी केली. पूजा विधी साठी प्रामुख्याने लागणाऱ्या साहित्यातील मुलींकडून काय करून घेता येईल ते ठरवले. तसेच इतर कोणत्या कलाकृती, साहित्य, खाद्य पादार्थ करून घेता येतील ते निश्चित केले. त्यानुसार मुलींना उपक्रमाचे नियोजन सांगितले.

* **प्रत्यक्ष कलाकृती निर्मितीः** मोबाईलवर लिंक पाठवून विद्यार्थिनींना उपक्रमासाठी उपस्थित करून घेतले. प्रत्येक वेळी विद्यार्थिनींना ऑनलाईन प्रथम स्वतः कृती ऑनलाईन करून दाखवल्या. प्रात्यक्षिकातून विद्यार्थिनींना प्रोत्साहन दिले. त्यांच्या शंका दूर करुन त्यांच्याकडून कृती पूर्ण करून घेतल्या.

* **सृजनशीलता, आत्मविश्वास विकासः** कलाकृती, साहित्य, पाककृती खाद्यपदार्थ तयार करीत असताना विद्यार्थिनींमधील सृजननशीलता जागृत झाली. स्वतःची कल्पकता वापरित सर्व कलाकृती अधिकाधिक आकर्षित करण्याचा त्या प्रयत्न करू लागल्या.

***कलाकृती निर्मिती, ऑनलाइन सादरीकरण व भरभरून कौतुकः** विद्यार्थनिंनी तयार केलेल्या कलाकृतींचे फोटो मोबाईलवर पाठविले. ते पाहून शालेय पदाधिकारी,संस्थाचालक, शिक्षक वृंद, पालक यांच्याकडून भरभरून कौतुक झाले.

* **स्वनिर्मित साहित्याचा वापरः** कलाकृती व इतर साहित्य, खाद्यपदार्थ निर्मितीतून विद्यार्थिनींना स्वनिर्मितीचा आनंद मिळाला. स्वकल्पना वापरून त्यात आकर्षकता आणावी यासाठी विचार प्रक्रिया सुरू झाली. त्यामुळे कृतीकौशल्यांचा अध्ययन क्षय(Learning Loss) कमी होण्यास मदत झाली.

विद्यार्थिनींच्या या उपक्रमशीलतेमुळे यावर्षी घरात साज-या होणा-या सणांना स्वनिर्मित कलाकृती व साहित्य वापरता आले. याचा विद्यार्थिनींना आणि त्यांच्या पालकांनाही अभिमान वाटू लागला.

* **तज्ज्ञांकडून मार्गदर्शनः** सदरचा उपक्रम ऑनलाइन घेतल्याने लिंक पाठवून सौ ज्योत्स्ना आपटे यांना कापसाची गेजवस्त्रे, फुलवाती शिकवण्यासाठी आमंत्रित केले. त्यांनी अतिशय सोप्या पद्धतीने विद्यार्थिनींना कृती शिकवली. मुलींनीही लगेच आपल्या साहित्यकृती तयार करून दाखविल्या. तयार करताना येणाऱ्या शंकांचे निरसन करून घेतले.

३ **उपक्रम पूर्ण झाल्यावर निरीक्षणे व त्यांच्या नोंदी**

१ सदर नवोपक्रम करीत असताना विद्यार्थिनी अतिशय उत्साही होत्या.

२ सतत नवनवीन काहीतरी तयार करण्यासाठी अगदी मागे लागायच्या

३ या उपक्रमामुळे त्यांची कल्पकता, निरीक्षण क्षमता वाढली.

४ निर्मिती क्षमता वृद्धिंगत झाली.

५ समाजाचा जबाबदार घटक होऊन समाजपयोगी वस्तू निर्माण करण्याची जाणीव झाली.

६ शिकता शिकता अर्थोत्पादन करण्याची क्षमता विकसित झाली.

७ संस्कृतीचे जतन आणि संवर्धन करण्याची जाणीव विकसित झाली.

८ श्रमजीवी लोकांबद्दल आदर वाढीस लागला.

**<u>४. कार्यवाहीत आलेल्या अडचणी</u>**

* **इंटरनेटची अनुपलब्धताः** उपक्रम सुरू असताना कधीकधी इंटरनेटची कनेक्टिव्हिटी कमी व्हायची. रेंजची समस्या निर्माण व्हायची. त्यामुळे मुलींना काही भाग समजायंचा नाही. तथापि रेंज आली की पुन्हा विवेचन करून, कृती करून दाखवून या समस्येवर मात करता आली.

*****साहित्याची अनुपलब्धताः** काही विद्यार्थीनींकडे उपक्रमासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध नव्हते परंतु तासाला ऑनलाइन हजर राहून कृती समजून घेतली. नंतर ते साहित्य उपलब्ध करून त्यांनी कलाकृती तयार केली.

* **विद्यार्थिनींच्या मनातील न्यूनगंडः** सदर उपक्रमाची संकल्पना स्पष्ट केल्यानंतर ऑनलाइन पद्धतीने शिकून आपल्याला कृती करता येईल का असा न्यूनगंड विद्यार्थिनींच्या मनात होता. परंतु जसजशी त्यांना कृती करता यायला लागली तसा त्यांचा आत्मविश्वास वाढला. स्वकल्पनेतूनही त्या अधिकाधिक आकर्षक साहित्य निर्मिती करू लागल्या.

*****नेटपॅकची अनुपलब्धता** कधीकधी नेट पॅक न मारल्यामुळे काही विद्यार्थिनींना तासाला हजर राहणे शक्य होत नसे. तथापि नंतर त्या कृती समजून घेऊन साहित्य निर्मिती करीत असत.

*****पालकांचा विरोध** काही पालकांना असे वाटले की आधीच शाळेच्या अभ्यासाच्या तासांसाठी नेट उपलब्ध करून द्यावे लागते. आता या उपक्रमासाठीही ते द्यावे लागेल. तसेच अभ्यासाकडेही दुर्लक्ष होईल. वेळ वाया जाईल. परंतु जेव्हा त्यांनी आपल्या पाल्याने केलेल्या साहित्यकृती पाहिल्या त्यावेळी त्यांना अभ्यासेतर कृतींचे महत्त्व पटले. पाल्याची स्वकल्पनेने नवनिर्मिती करण्याची क्षमता समजली. तसेच आपली पाल्य अभ्यास सांभाळून ही कौशल्ये आत्मसात करत आहे याचे कौतुकही वाटले. आणि तिला स्वतः आवश्यक ती मदत करू लागले.

५. **माहितीचे विश्लेषण आलेख व तक्तेः** सदर उपक्रम हा जून २०२१ ऑक्टोबर २०२१ या कालावधीत राबवण्यात आला. या उपक्रमात २० विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या. उपक्रम सुरु करण्यापूर्वी उपक्रमाच्या अनुषंगाने एक पूर्व

निरीक्षण सूची तयार केली. सदर नवोपक्रमात घेतल्या जाणाऱ्या कृतींपैकी विद्यार्थिनींना काय काय करता येतं याची माहिती घेण्यासाठी ही सूची तयार केली. नंतर उत्तर निरीक्षण सूची तयार केली. दोन्ही सूचीतील माहितीच्या आधारे माहितीचे वर्गीकरण करून आलेख स्वरुपात व टक्केवारी स्वरुपात मांडणी केली.

विद्यार्थिनींना नवोपक्रमात घेतल्या गेलेल्या सर्व उपक्रमांची माहिती देऊन कृती करण्यासंबंधी प्रात्यक्षिकाद्वारे ऑनलाईन मार्गदर्शन केले. कुटुंबातील तसेच समाजातील कुटुंबांना विद्यार्थिनींच्या, कलाकृतींचा साहित्याचा लाभ करून देण्याची संधी विद्यार्थिनींना उपलब्ध करून दिली.

पूर्व आणि उत्तर सूची यांच्यातील प्राप्त कौशल्यांचे आलेखाच्या सहाय्याने निष्कर्ष काढले. विद्यार्थिनींच्या पूर्व सूची आणि उत्तर सूचीमध्ये प्राप्त केलेल्या कौशल्यानुसार तुलनात्मक आलेखांमध्ये असे दिसते की विद्यार्थिनींच्यामध्ये नवनवीन कलाकृती करण्याविषयी उत्सुकता वाढली असून त्या उत्साहाने आपली कल्पकता वापरून विविध कलाकृती, साहित्य तयार करू लागल्या आहेत. आपले कौशल्य वाढावे, आकर्षक कलाकृती तयार कराव्यात यासाठी विद्यार्थिनी स्वतः प्रयत्नशील झाल्या आहेत.

टेबल क्र. ४ कलाकृती तयार करता येण्यासंबंधी उपक्रम पूर्वस्थिती आणि उपक्रमोत्तर स्थिती

| अ.क्र. | विद्यार्थिनीचे नांव | शेगदाणा लाडू १ | | समईची वात २ | | फुलवात ३ | | गेजमाळ ४ | | गेजमाळेची फुलांची माळ ५ | | मातीचा नागोबा ६ | | राखी ७ | | कागदी पिशव्या ८ | | रंगीत पणत्या ९ | | पणती स्टँड १० | | तीळ, शेंगदाणा व गुळ यांचे लाडू ११ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पू. | उ. | पू. | उ. | पू. | उ. | पू. | उ. | पू. | उ. | पू. | उ. | पू. | उ. | पू. | उ. | पू. | उ. | पू. | उ. | पू. | उ. |
| १ | कु. काव्या भालचंद्र देशपांडे | × | ✓ | × | ✓ | × | ✓ | × | ✓ | × | × | × | ✓ | × | ✓ | × | ✓ | ✓ | ✓ | × | ✓ | × | ✓ |
| २ | कु. समृध्दी सुदर्शन पवार | × | ✓ | × | ✓ | × | ✓ | × | ✓ | × | ✓ | × | ✓ | ✓ | ✓ | × | ✓ | ✓ | ✓ | × | ✓ | × | ✓ |
| ३ | कु. जान्हवी अजित कांबळे | × | ✓ | ✓ | ✓ | × | ✓ | × | ✓ | × | ✓ | × | ✓ | × | ✓ | × | ✓ | ✓ | ✓ | × | ✓ | × | ✓ |
| ४ | कु. विशाखा सदाशिव कुलकर्णी | × | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | × | ✓ | × | ✓ | × | ✓ | × | ✓ | × | ✓ | ✓ | ✓ | × | ✓ | × | ✓ |
| ५ | कु. नंदिनी रामेश्वर सताधारी | × | ✓ | × | ✓ | × | ✓ | × | ✓ | × | ✓ | × | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | × | ✓ | × | ✓ |
| ६ | कु. तनिष्का अविनाश राऊत | × | ✓ | ✓ | ✓ | × | ✓ | × | ✓ | × | × | × | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | × | ✓ | × | ✓ |
| ७ | क. तन्वी गजानन कुडके | × | ✓ | ✓ | ✓ | × | ✓ | × | ✓ | × | ✓ | × | ✓ | ✓ | ✓ | × | ✓ | ✓ | ✓ | × | ✓ | × | ✓ |
| ८ | कु. श्रावणी श्रीकृष्ण होनमोरे | × | ✓ | × | ✓ | × | ✓ | × | ✓ | × | × | × | ✓ | ✓ | ✓ | × | ✓ | ✓ | ✓ | × | ✓ | × | ✓ |
| ९ | कु. चेतना रविंद्र पवार | × | ✓ | × | ✓ | × | ✓ | × | ✓ | × | ✓ | × | ✓ | ✓ | ✓ | × | ✓ | ✓ | ✓ | × | ✓ | × | ✓ |
| १० | कु. रमा चिंतामणी ताम्हनकर | ✓ | ✓ | × | ✓ | ✓ | ✓ | × | ✓ | × | ✓ | × | ✓ | ✓ | ✓ | × | ✓ | ✓ | ✓ | × | ✓ | ✓ | ✓ |
| ११ | कु. समिक्षा भारत गवंडी | × | ✓ | × | ✓ | × | ✓ | × | ✓ | × | × | × | ✓ | ✓ | ✓ | × | ✓ | ✓ | ✓ | × | ✓ | × | ✓ |
| १२ | कु. सोमेश्वरी सुभाष शिंदे | ✓ | ✓ | × | ✓ | × | ✓ | × | ✓ | × | × | × | ✓ | ✓ | ✓ | × | ✓ | ✓ | ✓ | × | ✓ | × | ✓ |
| १३ | कु. रामेश्वरी सुभाष शिंदे | ✓ | ✓ | × | ✓ | × | ✓ | × | ✓ | × | × | × | ✓ | ✓ | ✓ | × | ✓ | ✓ | ✓ | × | ✓ | × | ✓ |
| १४ | कु. दिव्या बाळासो डोंगरे | × | ✓ | × | ✓ | × | ✓ | × | ✓ | × | ✓ | × | ✓ | × | ✓ | × | ✓ | ✓ | ✓ | × | ✓ | × | ✓ |
| १५ | कु. साजिरी राकेश कोगनोळे | × | ✓ | × | ✓ | × | ✓ | × | ✓ | × | × | × | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | × | ✓ | × | ✓ | × | ✓ |
| १६ | कु. केतकी रमाकांत भजनावळे | × | ✓ | × | ✓ | × | ✓ | × | ✓ | × | ✓ | × | ✓ | ✓ | ✓ | × | ✓ | ✓ | ✓ | × | ✓ | × | ✓ |
| १७ | कु. रिद्धी राहूल कदम | × | ✓ | × | ✓ | × | ✓ | × | ✓ | × | ✓ | × | ✓ | ✓ | ✓ | × | ✓ | ✓ | ✓ | × | ✓ | × | ✓ |
| १८ | कु. ईश्वरी अवधुत कुलकर्णी | ✓ | ✓ | × | ✓ | × | ✓ | × | ✓ | × | ✓ | × | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | × | ✓ | ✓ | ✓ |
| १९ | कु. उत्कर्षा अंकुश वाघमोडे | × | ✓ | × | ✓ | × | ✓ | × | ✓ | × | ✓ | × | ✓ | ✓ | ✓ | × | ✓ | ✓ | ✓ | × | ✓ | × | ✓ |
| २० | कु. जान्हवी विनोद चव्हाण | × | ✓ | × | ✓ | × | ✓ | × | ✓ | × | ✓ | × | ✓ | ✓ | ✓ | × | ✓ | ✓ | ✓ | × | ✓ | × | ✓ |

टेबल क्रमांक ५

**विद्यार्थिनींच्या पूर्व सूची व उत्तर सूचीमध्ये वाढ झालेले शेकडा प्राप्तांक**

| अ.क. | विद्यार्थिनीचे नांव | उपक्रम पूर्व प्राप्त कौशल्ये | उपक्रमोत्तर प्राप्त कौशल्ये |
|---|---|---|---|
| १. | कु. काव्या भालचंद्र देशपांडे | ०१ | ०९ |
| २. | कु. समृध्दी सुदर्शन पवार | ०२ | ०९ |
| ३. | कु. जान्हवी अजित कांबळे | ०२ | ०९ |
| ४. | कु. विशाखा सदाशिव कुलकर्णी | ०३ | ०८ |
| ५. | कु. नंदिनी रामेश्वर सताधारी | ०३ | ०८ |
| ६. | कु. तनिष्का अविनाश राऊत | ०४ | ०५ |
| ७. | क. तन्वी गजानन कुडके | ०३ | ०८ |
| ८. | कु. श्रावणी श्रीकृष्ण होनमोरे | ०२ | ०८ |
| ९. | कु. चेतना रविंद्र पवार | ०२ | ०९ |
| १०. | कु. रमा चिंतामणी ताम्हनकर | ०५ | ०६ |
| ११. | कु. समिक्षा भारत गवंडी | ०१ | ०८ |
| १२. | कु. सोमेश्वरी सुभाष शिंदे | ०३ | ०८ |
| १३. | कु. रामेश्वरी सुभाष शिंदे | ०३ | ०८ |
| १४. | कु. दिव्या बाळासो डोंगरे | ०१ | १० |
| १५. | कु. साजिरी राकेश कोगनोळे | ०२ | ०८ |
| १६. | कु. केतकी रमाकांत भजनावळे | ०२ | ०९ |
| १७. | कु. रिद्धी राहूल कदम | ०१ | १० |
| १८. | कु. ईश्वरी अवधुत कुलकर्णी | ०५ | ०६ |
| १९. | कु. उत्कर्षा अंकुश वाघमोडे | ०१ | १० |
| २०. | कु. जान्हवी विनोद चव्हाण | ०१ | १० |

टेबल क्रमांक ६

| अ.क. | कौशल्य | उपक्रम पूर्व प्राप्त विद्यार्थिनी संखया | उपक्रमोत्तर प्राप्त विद्यार्थिनी संखया | फरक | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १. | शेंगदाणा लाडू बनविणे | ०४ | २० | १६ | ८० |
| २. | समईची वात बनविणे | ०४ | २० | १६ | ८० |
| ३. | फुलवात बनविणे | ०२ | २० | १८ | ९० |
| ४. | गेजमाळ बनविणे | ०० | २० | २० | १०० |
| ५. | गेजमाळेची फुलमाळ बनविणे | ०० | १४ | १४ | ७० |
| ६. | मातीचा नागोबा बनविणे | ०० | २० | २० | १०० |
| ७. | राखी तयार करणे | १६ | २० | ०४ | २० |
| ८. | कागदी पिशव्या तयार करणे | ०४ | २० | १६ | ८० |
| ९. | रंगीत पणत्या तयार करणे | १९ | २० | ०१ | ५ |
| १०. | पणती स्टँड तयार करणे | ०० | २० | २० | १०० |
| ११. | तीळ गुळाचे लाडू बनिवणे | ०२ | २० | १८ | ९० |

आलेख क्र.१

विद्यार्थिनींच्या पूर्व सूची आणि उत्तर सूची यातील गुणांमध्ये पडलेला फरक



विद्यार्थिनींच्या पूर्व सूची आणि उत्तर सूची यातील गुणांमध्ये झालेली संख्यात्मक वाढ

आलेख क्र. ०२



**९. नवोपक्रमाची यशस्विता / फलनिष्पत्ती (उद्दिष्टांनुसार)**

''कलाकृतींच्या निर्मितीतून संस्कृतीचा शिकवू वारसा
आत्मनिर्भर विद्यार्थी घडवू, जागृत करुनी आत्मविश्वासा''

१. **विद्यार्थिनींच्यामधील कृतियुक्त नवनिर्मिती क्षमतांशी निगडीत अध्ययन क्षय(Learning Loss)- शोधणे.**

निरीक्षणसूचीच्या सहाय्याने विद्यार्थिमधील अध्ययन क्षंय (Learning Loss) शोधला तेव्हा असे दिसून आले की -

- विद्यार्थिनींना कृतियुक्त साहित्य तयार करण्यातील अडचणी समजल्या.
- विद्यार्थिनींचा कैशल्यात्मक विकास कमी झालेला आहे हे लक्षात आले.
- विद्यार्थिनींना प्रत्यक्ष कृतियुक्त अध्ययनाचा अनुभव देणे आवश्यक आहे हे समजले

२. **विद्यार्थिनींमध्ये नवनिर्मिती क्षमता येण्यासाठी उपक्रमांची निर्मिती करणे.**

- विद्यार्थिनींचा कृतियुक्त साहित्य तयार करण्याच्या कौशल्यातील अध्ययन क्षय (Learning Loss)कमी करण्यासाठी उपक्रमांची निर्मिती व अंमलबजावणी केली.
- त्याची परिणामकारकता फलनिष्पत्ती / यशस्वीतेमध्ये दिसून आली.

३. **विद्यार्थिनींमध्ये श्रम प्रतिष्ठा मूल्य जोपासणे**

**व्याख्यानातून आणि कलाकृती साहित्याच्या निर्मितीतून**

- विद्यार्थनींना श्रमाचे महत्व समजले.
- विद्यार्थनींना श्रमजीवी लोकांविषयी आदर निर्माण झाला.
- विद्यार्थनींना श्रमिक लोकांना सन्मान दिला पाहिजे याची जाणीव झाली.

४. **विद्यार्थनींमध्ये नवनिर्मिती क्षमता प्रात्यक्षिकाव्दारे विकसित करणे**

- विद्यार्थनींना कलाकृती कशा तयार कराव्यात ते समजले.
- प्रात्यक्षिक व कृतीव्दावरे शिकविल्यामुळे विद्यार्थिनींना कृती समजली
- कलाकृतींची प्रमाणबद्धता, आकर्षकता, त्यांचे महत्त्व याची माहिती मिळाली.

५. **विद्यार्थनींमध्ये आत्मविश्वास वाढविणे आणि त्यांना आत्मनिर्भर बनविणे**

- सण उत्सवात स्वतः कलाकृती, संबंधित साहित्य तयार करता येईल असा आत्मविश्वास विद्यार्थिनींमध्ये निर्माण झाला.
- विद्यार्थिनी कलाकृती निर्मितीसाठी लागणा-या साहित्याची हाताळणी आत्मविश्वासाने करु लागल्या
- विद्यार्थिनींना स्वनिर्मित वस्तुंची संकल्पना समजली.
- विद्यार्थिनींना संस्कृतीचा वारसा जपण्यासाठी कलाकृती तयार करण्याचे महत्त्व कळाले.
- विद्यार्थिनींना या वस्तूंच्या निर्मितीतून अर्थार्जन स्वकमाई करुन आत्मनिर्भर होता येते याची जाणीव झाली.
- विद्यार्थिनी स्वनिर्मितीचा आनंद अनुभवू लागल्या.

६. **विद्यार्थिनींमध्ये नवनिर्मिती क्षमता येण्यासाठी राबविलेल्या उपक्रमांची परिणामकारकता अभ्यासणे.**

- विद्यार्थिनींमध्ये कृतिकौशल्या विकसित झाले.
- विद्यार्थिनींमध्ये नवनिर्मिती क्षमता विकसित झाली.
- विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास वाढला.
- विद्यार्थिनी आत्मनिर्भर बनल्या.

वरील यशस्वीतेवरुन राबविलेले उपक्रम सकारात्मकरित्या परिणामकारक आहेत असे दिसून आले.

आपल्या मुली शाळा अभ्यास सांभाळून कमीत कमी खर्चात आकर्षक व उपयुक्त कलाकृती तयार करतात याचा पालकांनाही अतिशय आनंत झाला.

विद्यार्थिनींच्या निर्मिती क्षमतेला, कल्पकतेला प्रोत्साहन दिल्याने अतिशय सुंदर कलाकृती त्या तयार करू शकतात याची प्रचिती इतर शिक्षकांनाही आली.

उपक्रम घेत असताना विद्यार्थिनींना प्रोत्साहन मिळावे, दिनविशेषानुसार कलाकृती, साहित्य निर्मिती करता यावी यासाठी स्वतः कृती करून दाखवून

प्रात्यक्षिकातून मार्गदर्शन केले. त्याचे फोटो परिशिष्टात जोडले आहेत. उपक्रमाविषयी विद्यार्थिनींचे व पालकांचे अभिप्रायही परिशिष्टात जोडले आहेत.

सदरचा नवोपक्रम विद्यार्थिनी, शिक्षक, पालक, शाळा, समाज या सर्वांसाठी निश्चितच उपयुक्त ठरला.

## १०. सारांश

शालेय जीवनात विद्यार्थ्यांकडे प्रचंड उत्साह आणि उर्जा असते. ती समाजोपयोगी उत्पादक कार्यात परावर्तित करण्यासाठी शालेय उपक्रमांची अतिशय मोलाची मदत होते. विद्यार्थ्यांच्या सुप्त सर्जनशीलतेचे, नवनिर्मिती क्षमतेचे प्रकटन करण्याचे उपक्रम हे प्रभावी माध्यम आहे.

सदरच्या नवोपक्रमात सादरकर्तीने विविध सण-उत्सवांच्या निमित्ताने लागणाऱ्या कला कृती व साहित्य स्वतः तयार करून दाखवून विद्यार्थिनींना प्रेरणा देऊन त्यांना कलाकृती तयार करण्यासाठी मनोबल दिले. उत्साह निर्माण केला. या उपक्रमामुळे विद्यार्थिनींची कल्पकता तसेच आत्मविश्वासही वाढला.

सदर नवोपक्रम फारच प्रभावी आणि सध्याच्या ताण-तणावाच्या आणि अभ्यासकेंद्री वातावरणातून निर्मितीक्षम, तणावमुक्त, आत्मनिर्भर जीवन जगण्यासाठी उपयुक्त ठरला. विद्यार्थिनींना तसेच पालकांनाही वेळेचा नाविन्यपूर्ण सदुपयोग करून जीवनावश्यक कौशल्ये संपादित करता आल्याने हा उपक्रम फारच आवडला.

विद्यार्थिनींचा कृतीयुक्त विकास साध्य करता आला तसेच नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील ‘आत्मनिर्भर विद्यार्थी’, ‘कौशल्य विकास’ या संकल्पना सफल झाल्या.

## ११. **समारोप**

सध्याच्या कोरोना महामारीच्या संकट काळात प्रत्यक्ष शिक्षण शाळांमध्ये होत नाही. त्यातच आजच्या अभ्यासकेंद्री स्पर्धेच्या जगात टिकून राहण्यासाठी विद्यार्थ्यांनाही सतत ताण-तणाव येत असतात. अशावेळी कलाकृती, साहित्य निर्मिती उपक्रम विद्यार्थिनींना नवनिर्मितीचा आनंद देणारा, तणाव कमी करून कल्पकतेस वाव देणारा, आत्मनिर्भर बनण्यासाठी उपयुक्त ठरला. तसेच पर्यावरणपूरक वस्तू निर्मितीचे महत्त्व पटवून देणारा ठरला. थोडीशी कल्पकता, प्रोत्साहन, आणि विद्यार्थ्यांसाठी आपला स्वतःचा वेळ दिल्यास त्यांच्यातील कल्पकता व चैतन्य यांच्या मिलाफातून विद्यार्थी आकर्षक कलाकृती, साहित्य निर्माण करू शकतात. स्वनिर्मितीतून आत्मविश्वासाचा दीप तेवत ठेवून तो तेजोमय प्रकाश कौशल्याधिष्ठित आणि आत्मनिर्भर समाज निर्मितीस सहायभूत ठरु शकतो.

सदरचा नवोपक्रम इतर शाळेतील शिक्षकांसाठी प्रेरणादायी आहे. हा उपक्रम महाराष्ट्रातील कोणत्याही शाळेत राबविता येईल.

## १२. संदर्भसूची


१. कदम चा.प., 'शैक्षणिक मुल्यमापन व संख्याशास्त्र' , नूतन प्रकाशन, पुणे

२. बापट भा.गो. (१९८४), शैक्षणिक कृति संशोधन , नूतन प्रकाशन, पुणे

३. कार्यानुभव शिक्षक हस्तपुस्तिका, इयत्ता आठवी (१९९६) महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे

४. दांडेकर रेणू (२००५) ' शिक्षणातील चांगले काही प्रफुल्लता प्रकाशन, पुणे

५. https://youtu.be/XeS2YP2gCml कोविड कालावधीतील शिक्षकाची भूमिका

६. https://youtu.be/ZsGJXFwRbYE How to make cotton flower vastramal

७. https://youtu.be/E8yyaX_KcaKकरवंटीपासून दिवाळी पणती स्टँड तयार करणे

८. https://youtu.be/gOVEmfLocvs टाकाऊ सी.डी.पासून पणती डेकोरेशन भाग १

# परिशिष्टे

## परिशिष्ट ‘अ’

सहभागी विद्यार्थिनींची यादी

| अ.क. | विद्यार्थिनीचे नांव |
|---|---|
| १. | कु. काव्या भालचंद्र देशपांडे |
| २. | कु. समृध्दी सुदर्शन पवार |
| ३. | कु. जान्हवी अजित कांबळे |
| ४. | कु. विशाखा सदाशिव कुलकर्णी |
| ५. | कु. नंदिनी रामेश्वर सताधारी |
| ६. | कु. तनिष्का अविनाश राऊत |
| ७. | क. तन्वी गजानन कुडके |
| ८. | कु. श्रावणी श्रीकृष्ण होनमोरे |
| ९. | कु. चेतना रविंद्र पवार |
| १०. | कु. रमा चिंतामणी ताम्हनकर |
| ११. | कु. समिक्षा भारत गवंडी |
| १२. | कु. सोमेश्वरी सुभाष शिंदे |
| १३. | कु. रामेश्वरी सुभाष शिंदे |
| १४. | कु. दिव्या बाळासो डोंगरे |
| १५. | कु. साजिरी राकेश कोगनोळे |
| १६. | कु. केतकी रमाकांत भजनावळे |
| १७. | कु. रिद्धी राहूल कदम |
| १८. | कु. ईश्वरी अवधुत कुलकर्णी |
| १९. | कु. उत्कर्षा अंकुश वाघमोडे |
| २०. | कु. जान्हवी विनोद चव्हाण |

**परिशिष्ट ‘ब’** निरीक्षण सूची ०१ कलाकृती तयार करता येण्यासंबंधी उपक्रम पूर्वस्थिती आणि उपक्रमोत्तर स्थिती

| अ.क्र. | विद्यार्थिनीचे नांव | शेगदाणा लाडू १ | | समईची वात २ | | फुलवात ३ | | गेजमाळ ४ | | गेजमाळेची फुलांची माळ ५ | | मातीचा नागोबा ६ | | राखी ७ | | कागदी पिशव्या ८ | | रंगीत पणत्या ९ | | पणती स्टँड १० | | तीळ, शेंगदाणा व गुळ यांचे लाडू ११ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पू. | उ. | पू. | उ. | पू. | उ. | पू. | उ. | पू. | उ. | पू. | उ. | पू. | उ. | पू. | उ. | पू. | उ. | पू. | उ. | पू. | उ. |
| १ | कु. काव्या भालचंद्र देशपांडे | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| २ | कु. समृध्दी सुदर्शन पवार | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ३ | कु. जान्हवी अजित कांबळे | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ४ | कु. विशाखा सदाशिव कुलकर्णी | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ५ | कु. नंदिनी रामेश्वर सताधारी | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ६ | कु. तनिष्का अविनाश राऊत | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ७ | क. तन्वी गजानन कुडके | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ८ | कु. श्रावणी श्रीकृष्ण होनमोरे | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ९ | कु. चेतना रविंद्र पवार | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १० | कु. रमा चिंतामणी ताम्हनकर | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ११ | कु. समिक्षा भारत गवंडी | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १२ | कु. सोमेश्वरी सुभाष शिंदे | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १३ | कु. रामेश्वरी सुभाष शिंदे | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १४ | कु. दिव्या बाळासो डोंगरे | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १५ | कु. साजिरी राकेश कोगनोळे | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १६ | कु. केतकी रमाकांत भजनावळे | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १७ | कु. रिद्धी राहूल कदम | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १८ | कु. ईश्वरी अवधुत कुलकर्णी | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १९ | कु. उत्कर्षा अंकुश वाघमोडे | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| २० | कु. जान्हवी विनोद चव्हाण | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

**परिशिष्ट ‘क’**

निरीक्षण सूची २

| अ.क. | विद्यार्थिनीचे नांव | उपक्रम पूर्व प्राप्त कौशल्ये | उपक्रमोत्तर प्राप्त कौशल्ये |
|---|---|---|---|
| १. | कु. काव्या भालचंद्र देशपांडे | | |
| २. | कु. समृध्दी सुदर्शन पवार | | |
| ३. | कु. जान्हवी अजित कांबळे | | |
| ४. | कु. विशाखा सदाशिव कुलकर्णी | | |
| ५. | कु. नंदिनी रामेश्वर सताधारी | | |
| ६. | कु. तनिष्का अविनाश राऊत | | |
| ७. | क. तन्वी गजानन कुडके | | |
| ८. | कु. श्रावणी श्रीकृष्ण होनमोरे | | |
| ९. | कु. चेतना रविंद्र पवार | | |
| १०. | कु. रमा चिंतामणी ताम्हनकर | | |
| ११. | कु. समिक्षा भारत गवंडी | | |
| १२. | कु. सोमेश्वरी सुभाष शिंदे | | |
| १३. | कु. रामेश्वरी सुभाष शिंदे | | |
| १४. | कु. दिव्या बाळासो डोंगरे | | |
| १५. | कु. साजिरी राकेश कोगनोळे | | |
| १६. | कु. केतकी रमाकांत भजनावळे | | |
| १७. | कु. रिद्धी राहूल कदम | | |
| १८. | कु. ईश्वरी अवधुत कुलकर्णी | | |
| १९. | कु. उत्कर्षा अंकुश वाघमोडे | | |
| २०. | कु. जान्हवी विनोद चव्हाण | | |

आलेख क्र. २

| अ.क. | कौशल्य | उपक्रम पूर्व प्राप्त विद्यार्थिनी संखया | उपक्रमोत्तर प्राप्त विद्यार्थिनी संखया | फरक | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १. | शेंगदाणा लाडू बनविणे | | | | |
| २. | समईची वात बनविणे | | | | |
| ३. | फुलवात बनविणे | | | | |
| ४. | गेजमाळ बनविणे | | | | |
| ५. | गेजमाळेची फुलमाळ बनविणे | | | | |
| ६. | मातीचा नागोबा बनविणे | | | | |
| ७. | राखी तयार करणे | | | | |
| ८. | कागदी पिशव्या तयार करणे | | | | |
| ९. | रंगीत पणत्या तयार करणे | | | | |
| १०. | पणती स्टँड तयार करणे | | | | |
| ११. | तीळ गुळाचे लाडू बनिवणे | | | | |

## परिशिष्ट 'ड'

फोटो

फोटो



सौ. ज्योत्स्ना आपटे विद्यार्थिनींना कापसाची गेजमाळ (गेजवस्त्र) मोबाईलवरून ऑनलाईन शिकविताना



स्वत: तयार केलेल्या कागदी पिशव्या उत्साहाने दाखविणारी विद्यार्थिनी



स्वत: आकर्षकपणे रंगवून सजविलेल्या सुंदर पणतीची भेट देऊन सफाई कर्मचारी मावशींना दिवाळीच्या शुभेच्छा देणारी व श्रमिकांविषयी आदर व्यक्त करणारी विद्यार्थिनी




मातीचे नागोबा तयार कर
उपक्रमांतर्गत नागोबा तयार
शिकविताना नवोपक्रम साद
आणि उत्साहाने शिकणार
विद्यार्थिनी.

स्वत: तयार केलेले
मातीचे नागोबा दाखविणारी
आनंदित विद्यार्थिनी



## परिशिष्ट 'इ'

विद्यार्थिनी कलाकृती करीत असतानाची व्हिडिओ लिंक

https://youtu.be/vI1c4Z9IRog

## परिशिष्ट 'फ'

पालकांचा अभिप्राय

आपण सगळे व आपले पाल्य सध्या कोरोनाच्या कठीण परिस्थितीतून जात आहोत. कोणत्याच गोष्टीचं रुटीन लागत नाही आहे. आपली मुलं सुद्धा खूप कंटाळलेली आहेत.सध्या मोबाईलवरून online अभ्यास सुरू आहे. त्यातून विरंगुळा म्हणून कलाकृती तयार करण्यासाठी इच्छुक मुलींचा कलाविष्कार वर्ग तयार केलाय. यादवारे आपल्या सौ. उषा कुलकर्णी मॅडम मुलींना नवनवीन वस्तू करायला शिकवतात व मुलीही त्या वस्तू खूप आवडीने तयार करतात. खूपशा वस्तू अशा आहेत कि ज्याद्वारे अर्थार्जनही होऊ शकते. कागदी पिशव्या, दिवे, वाती,शेंगदाणा लाडू ह्या मधून छोटासा व्यवसायही होऊ शकतो. ह्या उपक्रमासाठी सौ. कुलकर्णी मॅडम ह्यांचे आभार. अशा छानशा उपक्रमात आमच्या चिमुकल्यांना सहभागी होण्याची संधी दिल्याबद्दल शाळेचेही खूप खूप आभार.

सोनाली सदाशिव कुलकर्णी
मिरज.

## परिशिष्ट 'ग'

विद्यार्थिनी मनोगत



नाव :- तन्वी गजानन कुडके.
इयत्ता :- ८वी , तुकडी :- अ.

नमस्कार, माझे नाव तन्वी गजानन कुडके आहे. मी आज आम्हाला सौ. उषा कुलकर्णी मॅडम यांनी शिकवलेल्या कलाविष्कार या ग्रुप बद्दल थोडक्यात सांगणार आहे.

आम्हाला मॅडमांनी वात, फुलवात, गेजवस्त्र, मातीचा नागोबा, कागदी पिशव्या, पणत्या रंगवणे हे सर्व घरात असलेल्या साहीत्यांपासून पासून कसे बनवायचे त्याचे त्यांनी आम्हाला खूप छान मार्गदर्शन दिले.

फुलवाती, वाती, गेजवस्त्र हे कापसापासून बनवतात हे माहीत होते, पण ते कसे बनवायचे हे त्यांनी खूप छान पद्धतीने शिकवले. नागपंचमीनिमित्त मातीपासून नागोबा कसा बनवायचा हे शिकवले, आम्ही नागपंचमीला त्या नागोबांची पुजा केली. वर्तमानपत्रापासून कागदी पिशव्या कसे बनवायचे हे शिकवले, व त्यांचा उपयोग कसा करायचा हे त्यांनी सांगितले घरी असलेल्या साहीत्यांपासुन पणत्या कश्या रंगवायच्या सज- वायच्या हे शिकवले. हे सर्व करतांना खुप आनंद वाटला.

हे सर्व करत असताना मला नवीन काही शिकायला मिळायलेच त्याबरोबरच मला हे सर्व करत असताना मला खुप छान वाटलं, मला त्या पुढील तासाला काय शिकवतील याची उत्सुकता वाढु लागली होती. या सर्व कला त्यांनी ऑनलाईन पद्धतीने शिकवल्या ते आम्हाला व्यवस्थीत कळेल असे सांगीतले. त्यांना मी अशी विनंती करते की यापुढेही त्या आम्हाला अश्याच सुंदर कला आम्हाला शिकवाव्यात.

धन्यवाद !